मुंबई । पुणे । कोल्हापूर । नाशिक । छत्रपती संभाजीनगर । सोलापूर । नागपूर । सातारा । जळगाव । नांदेड । अकोला । सांगली । अहमदनगर येथून प्रसिद्ध

SakalNews @SakalMediaNews www.esakal.com 9225 800 800



**केंद्रावर आरोप!**

केंद्र सरकारने देशाची आरोग्य व्यवस्था आजारी पाडली. 'एम्स'मधील वैद्यकीय सुविधा आणि कर्मचारीही अपुरे आहेत, असा आरोप मल्लिकार्जुन खर्गे यांना केला.

वृत्त : ११

# सकाळ

**लक्ष्य सेनचा निर्धार**

भारताचा स्टार बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन याने २०२१ मधील जागतिक स्पर्धेत ब्रॉझपदकावर मोहोर उमटवली होती. आता त्याची पुनरावृत्ती करण्याचा ध्यास त्याने बाळगला आहे.

वृत्त : १२



• मुंबई, सोमवार, १४ ऑगस्ट २०२३

किंमत ₹ ५ • आजचा अंक : पाने १६ (टुडेसह)

Publication**: Sakal** Date : **14/08/ 2023**

Edition: **Mumbai** Page Number**: 04**

# के. के. चा बहुभाषिक 'लव्ह ऑल' लवकरच

गेल्या काही वर्षांत इक्बाल, दंगल, भाग मिल्खा भाग, ८३ अशा खेळांवर आधारित 'स्पोर्टस ड्रामा' चित्रपटांना प्रेक्षकांची चांगलीच पसंती मिळताना दिसत आहे. असाच आता 'लव्ह ऑल' हा देखील बॅडमिंटन खेळाच्या पार्श्वभूमीवर आधारित आगामी चित्रपट लवकरच प्रदर्शित होत आहे. के. के. मेनन हे या चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. आपल्या मुलाला बॅडमिंटनमध्ये चॅम्पियन बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या वडिलांची भूमिका मेनन यांनी साकारली आहे. लेखक-दिग्दर्शक सुधांशू शर्मा यांचा 'लव्ह ऑल' हा चित्रपट २५ ऑगस्ट २०२३ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. महेश भट्ट, आनंद पंडित आणि पुलेला गोपीचंद प्रस्तुत दिलीप सोनी जैस्वाल, राहुल व्ही. दुबे आणि संजय सिंग निर्मित हा चित्रपट एम. रमेश यांच्या लक्ष्मी गणपती फिल्म्सद्वारे प्रदर्शित होत आहे. लव्ह ऑल मलेशियन, थाई, कोरियन, स्पॅनिश, जपानीज, इंडोनेशियन आणि फ्रेंच अशा सात परदेशी भाषांमध्ये तर हिंदी, तामिळ, तेलगू, मल्याळम, कन्नड, बंगाली आणि ओरिया या भारतीय भाषांमध्ये सबटायटल्ससह प्रदर्शित होणार आहे. नुकतीच या चित्रपटासंबंधी एक पत्रकार परिषद पार पडली. या वेळी अभिनेता के. के. मेनन, महेश भट्ट, विक्रम भट्ट, दिग्दर्शक सुधांशू शर्मा, आनंद पंडित, एम. रमेश, सह-निर्माता दिलीप सोनी जैस्वाल, राहुल व्ही. दुबे, संजय सिंग, गायक पेप्पन आणि चित्रपटाच्या संपूर्ण टीमने हजेरी लावली होती.

